Estd.1962
NAAC 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक क्रं. 9

विषय: शैक्षणिक वर्ष 2021–22 मधील ऑक्टो./नोव्हें, 2021 हिवाळी सत्रातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या नियोजनाबाबत. **(औषधनिर्माणशास्त्र, विधी, शिक्षणशास्त्र, वास्तुनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी)**

**(प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष फ्रेश प्रवेश वगळून)**

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार ऑक्टो./नोव्हें, 2021 हिवाळी सत्रातील **औषधनिर्माणशास्त्र, विधी, शिक्षणशास्त्र, वास्तुनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी** अभ्यासक्रमासाठी कोविड–19 च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर Online पध्दतीने परीक्षांचे नियोजन करण्यासाठी पुढीलप्रमाणे समन्वयक महाविद्यालय स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

1. **औषधनिर्माणशास्त्र, विधी, शिक्षणशास्त्र, वास्तुनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या परीक्षा सर्व महाविद्यालयांच्या सहाकार्याने दि. 25 जानेवारी, 2022 ते 25 फेब्रुवारी, 2022 या कालावधीमध्ये समन्वयक महाविद्यालय/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था यांनी Online पध्दतीने घेण्यात याव्यात.**
2. **विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार उपरोक्त परीक्षा प्रचलित Online स्वरूपात 50 गुणांची संपूर्ण अभ्यासक्रमावर अधारित (प्रश्नपत्रिकमध्ये एकूण 25 प्रश्न प्रत्येकी 02 गुणांचे असावेत), 1 तास कालावधीची, बहुपर्यायी प्रश्नावली (MCQ) पध्दतीने घेणेत यावी.**
3. उपरोक्त अभ्यासक्रमाच्या सर्व संलग्नीत महाविद्यालये यांनी परीक्षेकरीता विद्यापीठाकडून निश्चित केलेल्या समन्वयक महाविद्यालयांशी संपर्क साधून परीक्षेचे कामकाज पाहणारे आपल्या महाविद्यालयातील समन्वयक यांचे नांव, मोबाईल नंबर व अधिकृत ईमेल आयडी इत्यादी माहिती समन्वयक महाविद्यालय यांना देण्यात यावी.

**औषधनिर्माणशास्त्र, विधी, शिक्षणशास्त्र, वास्तुनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा खालील समन्वयक महाविद्यालयामार्फत घेण्यात येतील.**

| अ.क्रं. | विद्याशाखा | समन्वयक महाविद्यालय |
|---|---|---|
| 1 | **औषधनिर्माणशास्त्र** | भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, मोरेवाडी, कोल्हापूर |
| 2 | **विधी** | भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेज, कोल्हापूर |
| 3 | **शिक्षणशास्त्र** | मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, विटा, जि. सांगली |
| 4 | **वास्तुनिर्माणशास्त्र** | डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, कोल्हापूर |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | अभियांत्रिकी | **शाखानिहाय समन्वयक महाविद्यालये व परीक्षा खालीलप्रमाणे** | |
| | | तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | University B.Tech /M.Tech. (All Branches) (फक्त विद्यापीठ अधिविभाग) |
| | | के. आय. टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोल्हापूर. | Bio-Tech., Bio-Chemical Engg., Envirmental Engg., |
| | | दत्ताजीराव कदम टेक्सटाईल्स ॲण्ड इंजिनिअरींग इन्स्टिटयूट, इचलकरंजी, जि. कोल्हापूर | Textile Engg. |
| | | आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, आष्टा, जि. सांगली. | Aeronautical , Automobile, Mechanical & Automation |
| | | तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, वारणानगर, जि. कोल्हापूर | Chemical Engg., |
| | | भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, मोरेवाडी, कोल्हापूर | Information Technology, Computer Sci. Engg. |
| | | डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, कसबा बावडा, कोल्हापूर | Production Engg., |
| | | डॉ. जे. जे. मगदुम कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, जयसिंगूर, जि. कोल्हापूर | Electronics & Tel.Com. Engg., Electronics Engg., |
| | | डॉ. दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, बनवडी, ता. कराड, जि. सातारा | Civil Engg., Mechenical Engg., |
| | | संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, चिंचेवाडी, महागाव ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर | F.E. Engg & 1st year B.Tech (All Branches) |
| | | डॉ. डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस फॅकल्टी ऑफ इंजिनिअरींग, तळसंदे, जि. कोल्हापूर | Electrical Engg., |
| | | पद्‌मभुषण वसंतरावदादा पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, बुधगाव, जि. सांगली | Instrumentation Engg. |
| | | श्री. अंबाबाई तालीम संस्थेचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग. वानलेसवाडी मिरज, जि. सांगली. | Electrical & Electronics Engg. |

4. उपरोक्त व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या **सर्व सत्राच्या** परीक्षेचे वेळापत्रक समन्वयक महाविद्यालय/ मान्यताप्राप्त शिक्षण संस्था यांनी इतर महाविद्यालयांच्या समन्वयाने करून सदर वेळापत्रक ज्या ज्या महाविद्यालयामध्ये संबंधीत विषय शिकविला जातो अशा महाविद्यालयांना पाठविण्यात यावे. सदर वेळापत्रक महाविद्यालय / मान्यताप्राप्त शिक्षण संस्था स्तरावर प्रसिध्द करण्यात यावे.
5. संबंधीत समन्वयक महाविद्यालय यांनी ज्या विषयास विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत त्या विषयाच्या प्रश्नपत्रिका सेट तयार करून घेणेत याव्यात.
6. उपरोक्त सर्व अभ्यासक्रमासाठी संबंधीत समन्वयक महाविद्यालयामार्फत वेळापत्रक तयार करणे, वेळापत्रक प्रसिध्द करणे, प्रश्नपत्रिका तयार करणे व संपूर्ण परीक्षेचे नियोजन करून सुरळीतपणे परीक्षा पार पाडण्यात याव्यात.

7. उपरोक्त अभ्यासक्रमाच्या Online परीक्षा आयोजित करण्यात येणार असल्याने त्याबाबतची अनुषंगिक तयारी करण्यात यावी. तसेच सदरबाबतची सूचना सर्व संबंधीतांना देणेत याव्यात.

8. उपरोक्त सर्व परीक्षा महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर समन्वयक महाविद्यालयामार्फत होणार असल्याने सदर विषयाच्या प्रश्नपत्रिका महाविद्यालयातील शिक्षकाकडून तयार करून घेण्यात याव्यात. सदर शिक्षकांना प्रश्नपत्रिका तयार करण्याबाबतचे पत्र संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांनी द्यावे.

9. विद्यापीठाकडे प्राप्त होणा–या विद्यार्थ्यांच्या गुणांचे रूपातर (Conversion) आवश्यकतेप्रमाणे विद्यापीठाकडून करण्यात येणार असल्याने जे गुण विद्यार्थ्यांना प्राप्त होतील तेच गुण संगणक प्रणालीमध्ये भरणेचे आहेत. तसेच Online परीक्षा देत असतांना कोणतीही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास संबंधीत विद्यार्थ्यांची पुर्नपरीक्षा संबंधीत महाविद्यालय/क्लस्टर मार्फत तात्काळ घेण्यात यावी. विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत/गुणाबाबत कोणतीही तक्रार विद्यापीठाकडे येणार नाही याची दक्षता घ्यावी.

10. अभ्यासक्रमाशर संबंधीत प्रात्यक्षिक/प्रबंध/प्रकल्प/ मौखिक परीक्षा ऑनलाईन पध्दतीने संबंधीत अभ्यासमंडळाच्या सूचनेनुसार (लागू असल्यास) आयोजित करण्यात याव्यात. तसेच सदर परीक्षेच्या अनुषंगाने काही अडचणी उदभवल्यास संबंधीत विषयाचे बीओएस चेअरमन, मा. अधिष्ठाता यांचे मार्गदर्शन घेण्यात यावेत.

11. सदर परीक्षेकामी होणारा खर्च विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या तसलमात रक्कमेमधून विद्यापीठ नियमानुसार करण्यात यावा. तसेच देयके आदा करण्यासाठी या संदर्भ क्रं. परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/734, दि. 23 नोव्हेंबर, 2021 चे परिपत्रक अवलोकनी घ्यावे.

12. सदर परीक्षेचे कार्यवलन/संचलन/पर्यवेक्षण इत्यादी व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख यांचे मार्फत करणेची आहे.

13. महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर परीक्षा कर्तव्य पार पाडताना परीक्षेची गोपनीयता, पावित्र्यता जपणे आवश्यक आहे यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना अंमलात आणाव्यात व दक्षता घ्यावी.

14. कोव्हीड–19 बाबत प्रोटोकॉल/सूचना (CAB) बाबत वेळोवेळी शासन/स्थानिक प्रशासन यांनी दिलेले निर्देशाचे पालन करण्यात यावे.

14/1/22

(निवास माने)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/20
दि. 14 JAN 2022
प्रत:

1. मा. प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख
   सर्व सलंग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/अधिविभाग
   (औषधनिर्माणशास्त्र, विधी, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, वास्तुनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी अभ्यासक्रम)
2. सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– परीक्षा विभाग
3. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.
4. इंटरनेट विभाग – सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर ठेवण्यासाठी
5. परीक्षा विभागातील सर्व संबधित विभाग व अधिकारी – पुढील कार्यवाहीसाठी
6. पात्रता विभाग, पी.जी. प्रवेश विभाग – माहितीस्तव
7. जनसंपर्क अधिकारी कार्यालय – प्रसिध्दीकरीता